प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CIDCO
WE MAKE CITIES

सिडको
शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. १३.०३.२०२०**

## सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदी श्री. अश्विन मुद्गल

**श्री. अश्विन मुद्गल** यांनी सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार दि. १२ मार्च २०२० रोजी सिडकोचे मुख्यालय असलेल्या सिडको भवन, सीबीडी बेलापूर येथे स्वीकारला. सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदी नियुक्ती होण्यापूर्वी श्री. अश्विन मुद्गल हे नागपूर येथे अतिरिक्त विभागीय आयुक्त म्हणून कार्यरत होते.

सन २००७ च्या तुकडीतील भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी असलेल्या श्री. अश्विन मुद्गल यांनी आपल्या प्रशासकीय सेवेची सुरूवात नाशिक जिल्ह्याचे सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून केली. त्यानंतर पंढरपूर-सोलापूर येथे उपजिल्हा दंडाधिकारी, सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, सातारा व यवतमाळ येथे जिल्हाधिकारी, नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त, नागपूर इम्प्रूव्हमेन्ट ट्रस्टचे अध्यक्ष आणि नागपूरचे अतिरिक्त विभागीय आयुक्त म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळले आहेत. श्री. अश्विन मुद्गल हे वाणिज्यिक शाखेचे पदवीधर आहेत.

**“सद्यस्थितीत सिडकोतर्फे साकारण्यात येत असलेले महत्त्वाकांक्षी प्रकल्प नियोजित वेळेत मार्गी लावण्यास आपले प्राधान्य असेल, असे श्री. मुद्गल यांनी सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार स्वीकारते वेळी सांगितले.”**

**- श्री. अश्विन मुद्गल, सहव्यवस्थापकीय संचालक - १**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**